# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

विषय : पीएच्.डी. कोर्स वर्क आणि स्किल बेस कोर्सेस, ह्युमन राईटस्,सायबर सेक्युरिटी/इन्फॉर्मेशन सिक्युरीटी च्या श्रेयांकाच्या सुधारीत शुल्काबाबत...

मा. प्राचार्य /मा. संचालक, सर्व संलग्नीत संशोधन संस्था तसेच मा. विभागप्रमुख, विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग यांना प्राप्त आदेशानूसार कळविण्यात येते की, विद्यापीठाचे परिपत्रक क्र.पीजीएस/६७६ दि. २८/०२/२०२० अन्वये विविध अभ्यासक्रमाचे शुल्क विहीत करण्यात आलेले आहे. त्यामध्ये पीएच्.डी. अभ्यासक्रमाचाही समावेश आहे. सदर अभ्यासक्रमांसाठी विद्याशाखानिहाय शैक्षणिक शुल्क, इतर शुल्क व कोर्स वर्क शुल्क रु.१२,०००/— अवाजवी असल्याबाबत बऱ्याच विद्यार्थी तसेच विद्यार्थी संघटनाकडून निवेदने प्राप्त होत आहेत. या बाबतची वस्तुस्थिती विचारात घेता विद्यार्थी हिताच्या दृष्टीने पीएच्.डी. अभ्यासक्रमासाठी यापुर्वीचे परिपत्रक क्र. पीजीएस/७७१ दि.२६.०२.२०१६ अन्वये लागू केलेले शुल्क रु.७०००/— लागू करण्यात येत आहे. त्यानंतर प्रत्यक्षात कोर्स वर्क जेव्हा आयोजित करण्यात येईल त्याचवेळी पीएच्.डी. अभ्यासक्रमाचे कोर्स वर्क शुल्क आकारण्यात यावे.

तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी स्किल बेस कोर्सेस, ह्युमन राईटस्,सायबर सेक्युरिटी / इन्फॉर्मेशन सिक्युरीटी इत्यादीसाठी परिपत्रक क्र.पीजीएस/६७६ दि. २८/०२/२०२० अन्वये लागू करण्यात आलेले प्रती श्रेयांक रु.५००/— प्रमाणे १० श्रेयांकासाठीचे एकूण शुल्क रु.५०००/— मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| Skill Based Courses | 4 Credit | Rs.500 (Rs.125/- per Credit) |
| Human Rights | 2 Credit | Rs.150 (Rs.75/- per Credit) |
| Cyber/ Information Security | 4 Credit | Rs.300 (Rs.75/- per Credit) |
| Total : | 10 Credit | Rs.950/- for 10 Credit |

वरील प्रमाणे पीएच्.डी. अभ्यासक्रमासाठी शुल्क आकारणी बाबतची त्वरीत अंमलबजावणी करावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. शै.प्रवेश/३४७०
दिनांक : १०/०७/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा. संचालक, विद्यापीठ सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

E:/PGSection/Ph.D./circular